दूरध्वनी क्र.२२८२ १२३९/२२ ८२ ०९ २३ (का.)
Tel.No.२२८२ १२ ३९/२२८२ ०९ २३ (O.)

फॅक्स क्र.२२८२ २३ १२
Fax.No.२२८२ २३ १२

महाराष्ट्र शासन
आयुक्त मत्स्यव्यवसाय
यांचे कार्यालय तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई ४०० ००२.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
COMMISSIONER OF FISHERIES,
Taraporevala Aquarium, Netaji Subhash Road, Charni Road, Mumbai ४०० ००२.

Email -: mahafishcom@hotmail.com
Website -: http://fisheries.adfmaharashtra.in

जा.क्र.मत्स्य/भू/०११२०२/५८/५१३/२०२० दिनांक :- ३० /११/२०२१

प्रति,
प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय,
मुंबई/पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/लातूर

विषय - राज्यातील मच्छिमार ,मत्स्यसंवर्धक व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना क्षमतेनुसार मासेमारी करता न आल्याने सन २०२१-२२ या वर्षाची तलाव ठेका रक्कम भरणा करणेस मुदतवाढ देणेबाबत

संदर्भ - १. मा.मंत्री (वस्त्रोद्योग,मत्स्यव्यवसाय व बंदरे) यांनी महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघर्ष क,ती समितीचे दि.२१/११/२०२१ रोजीच्या पत्रावर दिलेले आदेश
२. शासन पत्र क्र. मत्स्यवि-२०२१/प्र. क्र.९६(भाग-१)/पदुम -१३ दि. २९/११/२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सदयस्थितीत कोरोना संसर्गाच्या दुसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर राज्यात घोषीत केलेल्या लॉकडाऊनमुळे राज्यातील मच्छिमार ,मत्स्यसंवर्धक व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था यांना आर्थिक दिलासा देण्याच्या दृष्टीने राज्यातील मासेमारीकरीता ठेक्याने देण्यात आलेल्या तलाव/जलाशयांची चालू वर्ष सन २०२१-२२ ची वार्षीक तलाव ठेका रक्कम भरणा करणेस व इष्टतम मत्स्यबोटुकली संचयनाची १० टकके आगाऊ रक्कम भरणा करणेस दि.३० नोव्हेंबर २०२१ पासून पुढील ३ महिने (दि.२८.०२.२०२२) पर्यंत मुदतवाढ दिल्याचे शासनाने उपरोक्त संदर्भिय शासन पत्र क्र.२ कळविले आहे. सदर शासन पत्राची प्रत पुढील उचित कार्यवाहीस्तव सोबत पाठविण्यात येत आहे.

तसेच पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धनासाठी ठेक्याने दिलेल्या क्षेत्रा ाची ठेका रक्कम भरणा करण्यास ठेका रक्कम भरणा करण्याच्या अंतिम दिनांकापासून पुढे तीन महिने मुदतवाढ देण्यात येत आहे.

तरी, सदरहू शासन पत्राच्या अनुषंगाने राज्यातील मच्छिमार ,मत्स्यसंवर्धक व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था यांना याबाबत अवगत करावे व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल मुख्य कार्यालयास सादर करावा.

सहपत्र:-वरिलप्रमाणे

(रा.ज.जाधव)
सहआयुक्त मत्स्यव्यवसाय(भुजल)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

१. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,ठाणे/पालघर/रायगड-अलिबाग/रत्नागिरी/सिंधुदूर्ग-/मालवण /पुणे/ सातारा /सांगली कोल्हापूर/ सोलापूर /नाशिक /अहमदनगर /जळगांव /धुळे नंदुरबाद/ औरंगाबाद /जालना /परभणी/बीड/ लातूर/नांदेड/उस्मानाबाद/हिंगोली /अमरावती/ यवतमाळ/अकोला/बुलढाणा/वाशिम /नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/ गडचिरोली/गोंदिया.
२. कार्यासन अधिकारी-(का.क्र.१/२/३/४/५/६/७/८/९/१०/११/१२/१३/१४/१५/१६/१७/१८/१९)

Scanned with CamScanner

पा/८७८

# महाराष्ट्र शासन

कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

Email -: yogesh.yelmar@gov.in दुरध्वनी क्र. (कार्यासन पदुम-१३):- ०२२-२२०२ ८१०७

क्र: मत्स्यवि-२०२१/प्र.क्र. ९६ (भाग-१)/पदुम-१३ दिनांक: २९ /११/२०२१

प्रति,

आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

**विषय :-** राज्यातील मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना क्षमतेनूसार मासेमारी करता न आल्याने सन २०२१-२२ या वर्षाची तलाव ठेका रक्कम भरणा करणेस मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ :-** १). समक्रमांकाचे शासनपत्र दि. २८/०५/२०२१
२). मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांनी महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघर्ष कृती समितीचे दि. २१/११/२०२१ रोजीच्या पत्रावर दिलेले आदेश

विषयांकित प्रकरणी कोरोना (COVID-१९) संसर्गाच्या दुसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर राज्यात घोषित लॉकडाऊनमुळे राज्यातील मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना आर्थिक दिलासा देण्याच्या दृष्टीने राज्यातील मासेमारीकरीता ठेक्याने देण्यात आलेल्या तलाव/जलाशयांची चालू वर्ष सन २०२१-२२ ची वार्षीक तलाव ठेका रक्कम भरणा करणेस व इष्टतम मत्स्य बोटुकली संचयनाची १० टक्के आगाऊ रक्कम भरणा करणेस दि.३० नोव्हेंबर २०२१ पासून पुढील ३ महिने (दि.२८.०२.२०२२ पर्यंत) मुदतवाढ देण्यात येत आहे .

तसेच पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धनासाठी ठेक्याने दिलेल्या क्षेत्राची ठेका रक्कम भरणा करण्यास ठेका रक्कम भरणा करण्याच्या अंतिम दिनांकापासुन पुढे तीन महिने मुदतवाढ देण्यात येत आहे .

शासनाच्या उपरोक्त निर्णयाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही आपले स्तरावरून करण्यात यावी, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(श्रीनिवास शास्त्री)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सौ. अर्चनागिरे
त्वरित सादर करावे
२०/११/२०२१

Desktop/योगेश/२०२१/प्रकरण नोंद/प्र. क्र. ९६-२०२१, दि. ०२/११/२०२१

Scanned with CamScanner